# पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
## जनसंपर्क शाखा

P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com


# वार्तापत्र

दिनांक ३०/०७/२०१९

## "आदिवासी विकास सप्ताहानिमित्ताने जिल्हाभरात नक्षलविरोधी शांततारॅलीचे यशस्वी आयोजन"

गडचिरोली जिल्हा पोलीस दलाच्या वतीने दिनांक २८ जुलै ते ३ ऑगस्ट दरम्यान 'आदिवासी विकास सप्ताह' साजरा करण्यात येत आहे. या सप्ताहाचे औचित्य साधुन गडचिरोली जिल्हा भरात पोलीस दलाच्या वतीने नक्षलविरोधी शांतता रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या नक्षलविरोधी शांतता रॅलीमध्ये दुर्गम  व अतिदुर्गम भागातील नागरीक, महिला व विद्यार्थीनी उत्स्फुर्त सहभाग नोंदवत नक्षलवाद हटावो, नक्षलवाद मुर्दाबादच्या घेषणा देत गडचिरोली जिल्ह्याच्या विकासासाठी गडचिरोली पोलीस दलाने 'आदिवासी विकास सप्ताहात' आपण सहभागी होण्यासाठी उत्स्फुर्तपणे या शांतता रॅलीत सहभागी होत असल्याबाबत आनंद व्यक्त केला.

त्याचबरोबर उपविभाग पेंढरी परिसरातील अबालवृध्दांनी महात्मा गांधीजींचा मुखवटा तोंडावर चढवुन हिंसा नको अहिंसा हवी असे म्हणत शांतता रॅलीत आपले सहभाग नोंदविला.

गडचिरोली जिल्ह्यात घेण्यात आलेल्या नक्षलविरोधी शांतता रॅलीमध्ये मरपल्ली, जिमलगट्टा, असरअल्ली या दुर्गम भागातील जनतेसह जवळजवळ ४ ते ५ हजार नागरिकांनी सहभाग नोंदवुन आपण मुसळधार पावसाची पर्वा न करता विकासासाठी एकत्र आलो असल्याचे सांगीतले.

आदिवासी विकास सप्ताह निमित्ताने घेण्यात आलेल्या शांतता रॅलीमधुन नागरीकांमध्ये जागृकता निर्माण होण्यास मदत होवुन मोठ्या प्रमाणावर नक्षलवादा विरोधात नागरिक स्वतःहुन पुढे येण्यास मदत झाली असे मा. पोलीस अधिक्षक, गडचिरोली श्री शैलेश बलकवडे सा़े. यांनी म्हटले आहे.



